महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य व्यवसाय बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश इलेक्ट्रीकल सुपरवायजर, ऑटोमोबाईल मेकॅनिक, इलेक्ट्रीकल वायरमन, मोटारवायडींग, कॉम्प्युटर ऑपरेटर, कॉम्प्युटर हार्डवेअर प्रत्येकी एक वर्ष पात्रता दहावी / बारावी एसटी पास/ लायसन /जॉबची सोय. डिप्लोमा फॅब्रिकेशन, एसीमेकॅनिक, इलेक्ट्रीकल, ऑटोमोबाईल

पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट

राधीका रोड, सातारा मो. ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

निरामय पॅरालिसिस सेंटर

निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा ॲण्ड फिजिओथेरपी सेंटर

किती ही जुने पॅरालिसिस असो, आयुर्वेदिक उपचार पध्दतीने १५ ते २० दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही ब्रेनचा कंट्रोल जाणे, वेडवर आहात? काळजी करु नका खात्रीशीर उपचार, १०० % गॅरंटी, आयुर्वेदिक तज्ज्ञांच्या निगराणीमध्ये.

शाखा क्र. १ मांजरी रेल्वे स्टेशन हडपसर, पुणे

शाखा क्र. २ खंडोबा माळ रोड, लोहगांव, पुणे

Contact: 9503310568

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १८ वे, अंक १२ वा | मंगळवार, दि. २५ जुलै २०२३ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# उजनीत वाढले पाच टीएमसी पाणी

## दुबार पंपिंगची चिंता आता दूर



| उजनी धरणाची सद्य:स्थिती | |
|---|---|
| पाण्याचा मृतसाठा | ५०. २९ टीएमसी |
| जिवंत पाणीसाठा | मायनस १३. १८ टीएमसी |
| दौंडवरून येणारा विसर्ग | १८,१८५ |
| पाण्याची टक्केवारी | मायनस २४. ८७ टक्के |

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पावसाळा सुरु होऊनही ९ जुलैपर्यंत उजनी धरण मायनस ३६.१९ टक्के होते. त्यामुळे दुबार पंपिंग सुरु करण्याची स्थिती निर्माण झाली होती. पण, लोणावळा, भीमाशंकर, खडकवासला धरणसाखळीत मुसळधार पाऊस झाल्याने उजनीत मागील सहा दिवसांत पाच टीएमसी पाणी वाढले आहे. त्यामुळे दुबार पंपिंगची चिंता आता दूर झाली आहे.

पुणे, सोलापूर, नगर या जिल्ह्यांसाठी वरदायिनी असलेल्या उजनी धरणाने तळ गाठला होता. पण, आता धरणातील पाणीसाठा वधारू लागला आहे. त्यातून शेतकऱ्यांसह काही शहरांना (ज्या शहराचा पाणीपुरवठा उजनीवर अवलंबून आहे अशी शहरे) दिलासा मिळाला आहे.

मात्र, सोलापूरला पाणीपुरवठा करणाऱ्या औज व हिप्परगा तलाव परिसरात अजूनही समाधानकारक झालेला नाही. त्यामुळे आगामी काही दिवसांत चांगला पाऊस न झाल्यास उजनीतून सोलापूर शहरासाठी पाणी सोडावे लागेल, अशी सद्य:स्थिती आहे. जिल्ह्यातील पेरण्याही अजून २० टक्क्यांवर गेलेल्या नाहीत.

बार्शी, पंढरपूर, करमाळा, मोहोळ, उत्तर सोलापूर, अक्कलकोट या तालुक्यांमध्ये पेरणी खूपच कमी आहे. त्यामुळे उजनी धरण १०० टक्के भरणे ही बाब शेतकऱ्यांसाठी खूप महत्त्वाची मानली जाते. सध्या धरणात दौंडवरून १८ हजार १८५ क्युसेक विसर्गाने पाणी येत आहे. असाच विसर्ग नियमित राहिल्यास २४ तासांत एक टीएमसी पाणी वाढते, असे लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

पावसाळा सुरु होऊन महिना लोटला तरीदेखील धरणाची मायनस पातळी सुधारत नव्हती. त्यामुळे सोलापूर, धाराशिव, इंदापूर, बारामती, नगर या शहरातील नागरिकांची चिंता वाढली होती. पण, काही दिवसांपूर्वी लोणावळा, भीमाशंकर घाट माथ्यावर आणि खडकवासला धरण साखळीत चांगला पाऊस झाला. त्यानंतर मागील सहा दिवसांत पुणे जिल्ह्यातून चांगला विसर्ग धरणात आला आणि उजनीची पाणीपातळी सव्वा मीटरने वाढली. त्यामुळे त्या शहरांवरील दुबार पंपिंगचे संकट तुर्तास टळले आहे.

# १० ऑगस्टपर्यंत शिंदे मुख्यमंत्रिपदावरुन पायउतार, अजितदादांच्या नेतृत्त्वात लोकसभा लढवली जाईल: पृथ्वीराज चव्हाण

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** येत्या १० तारखेपर्यंत किंवा त्यापूर्वी एकनाथ शिंदे हे अपात्र ठरून मुख्यमंत्रीपदावरून पायउतार होतील. त्यानंतर आगामी लोकसभेची निवडणूक ही अजित पवार यांच्या नेतृत्त्वाखाली लढवली जाईल, असा अंदाज काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी वर्तविला आहे. माझं आकलन असं आहे की, भाजपच्या ज्येष्ठ नेतृत्त्वासाठी लोकसभेची निवडणूक अत्यंत महत्त्वाची आहे. या निवडणुकीमुळे मोदी सत्तेत राहणार की नाही, हे ठरणार आहे. एकनाथ शिंदे हे ठाण्याच्या बाहेर आपला प्रभाव पाडू शकलेले नाहीत. त्यांच्या नेतृत्त्वाखाली भाजप सरकारला लोकसभा निवडणुकीला सामोरे जाता येणार नाही, ते उचित ठरणार नाही, असे भाजपचे राजकीय गणित असल्याचे माझे आकलन आहे, असे पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले. ते सोमवारी विधानभवनाच्या आवारात प्रसारमाध्यमांशी बोलत होते.




यावेळी पृथ्वीराज चव्हाण यांनी भाजपने अजित पवार यांना घेऊनच आगामी राजकारणाची आखणी केल्याचे भाकीत वर्तविले. आता आपण अजित पवार यांना सरकारमध्ये सामावून घेतलेच आहे तर लोकसभेची जबाबदारी त्यांच्यावरच द्यावी, असा भाजपच्या नेतृत्त्वाचा (पान २ वर..)

# सोलापुर शहर सेवादल यंग ब्रिगेडच्या वतीने महागाई, बेरोजगारी वाढविणाऱ्या मोदी सरकारच्या विरोधात निदर्शने

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मोदी सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे देशात महागाई, बेरोजगारी प्रचंड वाढली असून याविरोधात सोलापुर शहर सेवादल यंग ब्रिगेडच्या वतीने कोंतम चौक महात्मा बसवेश्वर पुतळा येथे महाराष्ट्र प्रदेश सेवादल यंग ब्रिगेड अध्यक्ष सुदीप चाकोते, सोलापुर शहर सेवादल यंग ब्रिगेड अध्यक्ष विवेक कन्ना यांच्या नेतृत्वाखाली सोलापुर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत निदर्शने आंदोलन करण्यात आले



यावेळी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी टमाटे आणि भाजीपाल्याचे हार घालुन जोरजोरात मोदी सरकार विरोधात घोषणाबाजी केली. यावेळी बोलताना अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे म्हणाले की, मोदी सरकारच्या धोरणांमुळे देशात प्रचंड महागाई, (पान २ वर..)






## संपादकीय

# चिंता वाढत्या 'थकबाकी' ची

नव्वदीच्या दशकात जागतिकीकरण झाल्यानंतर भारतात पाश्चिमात्य चंगळवादी उधळपट्टीचे वारे वाहू लागले. त्यानुसार बँकांच्या कार्यपद्धती बदलत गेल्या. श्रीमंत होण्यासाठी कर्ज काढायला घाबरू नका, अशा प्रकारची मांडणीही केली जाऊ लागली. बचतीच्या रकमेवर ठेवीदारांना व्याज देण्यासाठी बँकांनीही कर्जपुरवठ्यासाठी असलेल्या अटी, शर्थी आणि नियमांमध्ये असणारा कठोरपणा कमी केला. कर्जावरील व्याजदर कमी करण्याची स्पर्धा सुरू झाली. या जोडीला नागरिकांना कर्जचक्रात आणण्यासाठी क्रेडिट कार्डच्या रूपाने बँकांच्या हाती एक नवे हत्यार आले. पाच-सात वर्षांपूर्वीपर्यंत क्रेडिट कार्ड हे केवळ श्रीमंतांच्या किंवा उच्चभ्रू वगार्तील, गलेलठ्ठ पगार असणाऱ्या नोकरदारांच्या वॉलेटमध्येच दिसायचे. पण गेल्या पाच-सहा वर्षांमध्ये सर्वच बँकांनी क्रेडिट कार्ड वाटपासाठी स्वतंत्र विभाग तयार करून सर्वदूर याचा प्रसार केला. 'आज खर्च करा आणि 45 दिवसांनी पैसे द्या' हा क्रेडिट कार्डचा सर्वांत मोठा यूएसपी असून सर्वसामान्यांसह व्यावसायिक, उद्योजक, नोकरदारांना तोच सर्वाधिक प्रमाणात आकर्षित करणारा ठरला आहे. अर्थकारणाच्या चष्म्यातून पाहिल्यास क्रेडिट कार्डची ही सवलत खरोखरीच लाभदायक आहे; परंतु त्याचा वापर चोखपणाने करणाऱ्यांची आणि आज खर्च केलेल्या पैशाची 45 दिवसांत पूर्ण परतफेड करणाऱ्यांची संख्या फारशी दिसत नाही. पण परतफेड करण्यास कार्डधारक असमर्थ ठरल्यास क्रेडिट कार्ड कंपन्यांकडून थकित रकमेवर प्रचंड दराने व्याज आकारणी सुरू होते. त्यातून कार्डधारकाची थकित रक्कम झपाट्याने वाढत जाते. यादरम्यान 'मिनिमम अमाउंट ड्यू' नावाची सवलत कार्ड कंपन्यांकडून दिली जाते. प्रत्यक्षात तो चकवाच असतो. कारण कंपन्यांकडून पैसे भरणा करण्यासाठी सुरू असलेल्या तगाद्यातून सुटका करून घेता येईल असा विचार करून कार्डधारक ही रक्कम भरतो; पण उर्वरित रकमेवरील व्याज आणखी वाढत जाते आणि पाहता पाहता हा डोंगर काही हजारांवरून लाखांवर जातो. खर्च करताना आपल्याला आज पैसे द्यावे लागणार नाहीत, ही मानसिकता अधिक खचार्ला चालना देते आणि त्यातून अवास्तव, अनावश्यक खर्च केला जातो. तो करत असताना उत्पन्नाचा, परतफेडीचा विचार केला जात नाही. साहजिकच एकदम पैसे देण्याची वेळ येते तेव्हा हतबलता निर्माण होते. अशा हतबल झालेल्यांची संख्या भारतात वाढत असल्याचे आरबीआयच्या ताज्या पाहणीतून समोर आले आहे. रिझर्व्ह बँकेच्या एका आकडेवारीनुसार, एप्रिल 2023 मध्ये भारतातील क्रेडिट कार्डची एकूण थकबाकी 2 लाख कोटी रुपयांवर गेली आहे. एप्रिल 2023 मध्ये हा आकडा 2 लाख 258 कोटी रुपये इतका होता. गतवर्षीच्या तुलनेत तो सुमारे 30 टक्क्यांनी अधिक आहे. भारतात एकूण लोकसंख्येपैकी 4.5 टक्के लोकांकडे म्हणजेच सुमारे 8.5 कोटी लोकांकडे क्रेडिट कार्ड आहेत. गतवर्षी हा आकडा 7.5 कोटी इतका होता. जगभरात लोकसंख्येच्या तुलनेत क्रेडिट कार्ड वापरणाऱ्यांचे सर्वाधिक प्रमाण कॅनडा या देशात असून तेथे 82 टक्के नागरिक क्रेडिट कार्ड वापरतात. इस्रायलमध्ये हे प्रमाण 79 टक्के आहे. अमेरिकेमध्ये हे प्रमाण 66.7 टक्के इतके आहे. या देशांच्या तुलनेने भारतातील क्रेडिट कार्डचा वापर नगण्य आहे. परंतु यावरील थकबाकीचा आकडा चिंताजनक पातळीवर आहे. बँकांनी याबाबत चिंतेचे कारण नसल्याचे म्हटले असले तरी नागरिकांच्या दृष्टीने विचार करता काही बाबींची चिंता आहे. ही थकबाकी फेडण्यास देशातील क्रेडिट कार्डधारक सक्षम ठरतील का? ही परतफेड करेपर्यंत सुरू असणारा बँकांचा ससेमिरा पेलवण्याची क्षमता त्यांच्यापैकी किती जणांची आहे? तीन-चार हप्ते थकवल्यास कार्डधारक कंपन्यांकडून केल्या जाणाऱ्या कायदेशीर कारवाईची वेळ आल्यास त्याला हे कार्डधारक कसे सामोरे जातील? मुळात क्रेडिट कार्ड घेण्याचे फॅड केवळ चंगळवादी मानसिकतेतून वाढते आहे की उत्पन्न आक्रसत चालल्यामुळे जीवनशैलीचा स्तर कायम राखण्यासाठी हा पर्याय स्वीकारला जात आहे, हा यातील कळीचा प्रश्न आहे. आज मध्यमवर्गीय नोकरदाराच्या 'जीवनावश्यक' वस्तूंच्या यादीत टीव्ही, फ्रीज, वॉशिंग मशीन, मायक्रोवेव्ह, फूड प्रोसेसर, बाइक, कार, एसी, स्मार्टफोन, संगणक, लॅपटॉप यांसारख्या गोष्टींची भर पडलेली दिसते. बाजारात या सर्व वस्तू कर्जावर उपलब्ध आहेत. याशिवाय विशिष्ट बँकांच्या क्रेडिट कार्डद्वारे त्यांची खरेदी केल्यास घसघशीत सवलत मिळते. त्यामुळे अनेक जण क्रेडिट कार्डचा वापर करून सणासुदीच्या दिवसात या वस्तूंची खरेदी करून कुटुंबियांना आनंद देतात. पण आर्थिक क्षमतेचा विचार न करता अशी उधळपट्टी केली असेल तर त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागू शकतात. क्रेडिट कार्ड जवळ बाळगणे ही आजवर प्रतिष्ठेची बाब मानली जात होती. परंतु हळूहळू कजार्चे हे मृगजळ परवडणारे नसल्याचे लक्षात येऊ लागले आहे. त्यामुळे क्रेडिट कार्ड कशाला असा विचार सुज्ञ मंडळींकडून केला जात आहे. आजच्या आधुनिक अर्थशास्त्राची मांडणीही उत्पन्न वजा बचत आणि उर्वरित रकमेतून खर्च अशीच केली जात आहे. पुढे क्रेडिट कार्डच्या क्षेत्रात नवीन कंपन्या दाखल होतील, नवनव्या ऑफर्स येत राहतील. क्रेडिट कार्डची थकबाकी आपल्या सिबील स्कोअरवरही प्रतिकूल प्रभाव टाकते आणि हा स्कोअर कमी होतो. याचा फटका आपल्याला कर्ज मिळण्यात अडचणींच्या रूपाने बसतो. क्रेडिट कार्डचा योग्य वापर करून चांगली क्रेडिट हिस्ट्री निर्माण केली आहे. त्या जोरावर अनेक डिस्काउंट घेतली आहेत एवढेच नाही तर वेळेत क्रेडिट कार्ड बिल भरून त्या कंपन्यांकडून काही बक्षिसेही मिळवलेली आहेत. अर्थात, त्यासाठी थोडे नियोजन हवे. असे अनेकजण आहेत ज्यांनी मोठी खरेदी क्रेडिट कार्डवर केली, तेवढीच रक्कम बँकेत दीड महिना फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवली आणि योग्य वेळी रिपेमेंट करून बँकेतून व्याज मिळवले आणि वस्तूही काही दिवस आधी वापरली. पण हे काटेकोर नियोजन सर्वांना जमतेच असे नाही.

# व्ही. व्ही. पी. : विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी विश्वसनीय शैक्षणिक तंत्रशिक्षण संकुल

विद्या विकास प्रतिष्ठान अर्थात व्ही. व्ही. पी. ही संस्था ग्रामीण भागातील गरजू, हुशार, आणि वंचित घटकांना अत्यंत माफक फी मध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध व्हावे अशी मनोकामना धरून स्थापना करण्यात आली. संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. जी. के. देशमुख हे अभियांत्रिकी शिक्षण क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव असलेले व आय. ई. आय. या संस्थेच्या स्थापत्य विभागातील राज्य कार्यकारणी सदस्य आणि यशस्वी बांधकाम व्यावसायीक असुन त्यांचा गुणवत्ता हाच ध्यास असतो. संस्थेचे संस्थापक सचिव श्री. अमोल (नाना) चव्हाण हे बांधकाम क्षेत्राबरोबर तंत्रशिक्षण उभारणीचा ध्यास घेतलेले आहेत, तसेच संस्था संचालक श्री. मधुकर कटकधोंड हे कार्यकारी अभियंता म्हणून काम पाहिले आहे.





प्रा. डॉ. जी. के. देशमुख

संस्थापक अध्यक्ष



श्री. अमोल (नाना) चव्हाण

संस्थापक सचिव

सोलापूरातही दर्जेदार शिक्षण मिळते हे गेल्या १३ वर्षात व्ही. व्ही. पी. या संस्थेने सिध्द केले आहे. फक्त पुस्तकी ज्ञानाचे अभियंते न घडविता सामाजिक बांधिलकी जपणारे अष्टपैलू अभियंते घडविण्यासाठी व्ही. व्ही. पी. अभियांत्रिकीतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी अहोरात्र परिश्रम घेतात. स्थापनेच्या दुस-याच वर्षी आय. एस. ओ. मानांकन मिळविणारे आणि अल्पावधितच शैक्षणिक गुणवत्तेसाठी यु.जी.सी. मान्यता प्राप्त नॅशनल बोर्ड ऑफ ऑकिडेशनकडून "नॅक मानांकन" मिळविणारे असे हे अभियांत्रिकी महाविद्यालय आहे. महाविद्यालयाचे विद्यापीठ परिक्षेचे उत्तम निकाल चांगले प्लेसमेंट व इतर दिलेल्या शैक्षणिक सुविधा याचा विचार करून यु. जी. सी. ने महाविद्यालयास ( २फ ) व (१२ व ) मध्ये समाविष्ठ केले आहे. महाविद्यालय डॉ . बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाशी सलग्नीत असून मागील चार वषार्पासून विद्यापीठाचा 'अ' दर्जा महाविद्यालयास प्राप्त झाला आहे अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमेश मुगळे यांनी दिली. या विद्यापीठात गत प्रात्यक्षिकावर आधारीत सध्याच्या उद्योगाना उपयुक्त असणारे व प्रकल्प आधारीत शिक्षण देण्यास प्राधान्य दिले जाते.

सन २००७ मध्ये विजापूर रोडवर सोलापूरपासून अवघ्या ५ कि. मी. अंतरावर २० एकर क्षेत्रात तंत्रनिकेतनची स्थापना करण्यात आली. सदरील तंत्रनिकेतन एन. बी. ए. मानांकीत असून येथे मेकॅनिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, सिव्हील इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरिंग, या शाखेचे अभ्यासक्रम सुरू असून दजेदार शिक्षणासाठी सुपरिचित आहे. एन. बी. ए. मानांकनामुळे सध्या महाराष्ट्राबरोबरच बिहार राज्यातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सन २००९ सालापासून शैक्षणिक संकुलात विद्याथ्यार्ची मागणी लक्षात घेवून पदवी शिक्षण देण्यासाठी अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. या महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रमाचे अर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲन्ड डेटा सायन्स सिव्हील इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरिंग, इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग व मेकॅनिकल इंजिनिअरिंग सुरू आहेत. याच बरोबर २०१२ पासून मेकॅनिकल (डिझाईन) इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरिंग यामध्ये पदव्युतर अभ्यासक्रम चालू आहेत. सन २०१७ पासून सी. बी. एस. ई. आभ्यासक्रमाचे शालेय शिक्षण व ११ वी व १२ वीच्या विद्याथ्यार्साठी ज्युनिअर कॉलेज याच शिक्षण संकुला मार्फत सुरू करण्यात आले आहे. यामध्ये कॉप सायन्स व कॉम्प्युटर सायन्स या नाविण्यपूर्ण विषयाचा अंर्तभाव असल्याने विद्यार्थ्यांना १२ वी नंतर करीअरच्या विविध संधी असलेल्या वाटा निवडता येतात तसेच २०१९ पासून आय. टी. आय. कॉलेजही सुरू आहे. विद्यार्थ्यांची व शिक्षकांची संशोधन वृत्ती वाढीस लागावी व समाजोपयोगी संशोधन प्रकल्प तयार व्हावेत म्हणून महाविद्यालय नेहमी आग्रही असते. यासाठी महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे प्रकल्प हे इंडस्ट्री प्रायोजित असतात. विद्यार्थ्यांच्या मनातील सुप्त कलागुणाना वाव देण्यासाठी विझोटेक सारखे राष्ट्रीय स्तरावरील प्रकल्पस्पधेर्चे आयोजन केले जाते. दरवर्षी १५०० हुन अधिक विद्यार्थी सहभागी होतात आणि यामूळेच आतापर्यंत महाविद्यालयास सन २०११ व २०१३ असे दोनवेळा राज्यस्तरावरील प्रथम पारितोषिक मिळाले आहे. महाविद्यालयाचे ५ संशोधन प्रकल्पावर काम चालू असून त्याचेही पेटेंट घेण्याचे काम चालू आहे. आतापर्यंत एकूण ४४८ हुन अधिक संशोधन पेपर महाविद्यालयातील प्राध्यापकानी प्रसिध्द केले आहते तसेच विविध औद्योगिक, शैक्षणिक सी. ओ. इ. पुणे, यासारखी कॉलेजेस इन्फोसेस, विप्रो लि. इत्यादी अशा ४१ संस्थाशी सामंजस्याचे करार करण्यात आलेले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रगत ज्ञान मिळण्याच्या संधी उपलब्ध झाल्या असून, अनुभवी प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभत आहे.

महाविद्यालयाचा ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभाग हा अत्यंत कार्यक्षम असून अभियांत्रिकी शिक्षणानंतर अधिकाधिक विद्यार्थ्यांना उत्कृष्ठ पगाराची नोकरी मिळण्यासाठी प्लेसमेंट विभाग सतत प्रयत्नशील असतो. तंत्रशिक्षणामध्ये विद्याथ्यार्चा सर्वा 'गिण विकास व चौफेर प्रगती व्हावी यासाठी महाविद्यालय सतर्क असतात आणि यासाठी निरनिराळे उपक्रम हाती घेतले जातात यामध्ये प्रामुख्याने स्पोकन इंग्लिश, पर्सनिलिटी डेव्हलमेंट, माईड पॉवर याच बरोबर अभियांत्रिकीतील अद्ययावत ज्ञान विद्यार्थ्या "ना मिळावे म्हणून विविध विषयावर सातत्याने सेमिनार, वर्कशाप यांचे आयोजन केले जाते. पालक व विद्यार्थ्यांना नेहमी भेडसावणारा ज्वलंत प्रश्न म्हणजे शिक्षणानंतर नोकरीच्या संधी कोठे आहेत? यासाठी विद्यार्थी हा नोकरीक्षम बनविण्यासाठी इंड्रस्टीच्या मागण्या लक्षात घेवुन त्यांना विविध विषयात ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंन्ट विभागातर्फे सातत्याने ट्रेनिंग दिले जाते याचेच फलित म्हणून स्थापनेपासून सातत्याने प्रतीवर्ष ७०% पेक्षा अधिक प्लेसमेंन्ट झाले आहेत. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभागाने नामांकित कंपन्याचे मुलाखती आयोजन करून मोठया प्रमाणत विद्यार्थ्यांना नोकरीची संधी प्राप्त करून दिली. यामध्ये प्रामुख्याने इन्फोसीस, कॅप जेमीनी असेंचर, कॉन्गीजेन्ट, वीप्रो, झेनपॅक, एच . सी . एल . ॲक्टी सीस्टीम, ॲटॉस ग्लोबल, पेंन्टगॉन स्पेस, टेक माहिंन्द्रा, टाटा इलॅक्सी, ब्रीगोजा टेक्नॉलॉजी, ब्रिस्टेलेकॉन, फिजीस्तो, फ्लॅश इलेक्ट्रिॉनीक्स, टेस्ट यंत्रा, जॉन डिअर (ई) लि. पुणे, इस्टसन इलेक्ट्रॉनिक्स लि. पुणे, ॲडव्हीक हायटेक प्रा. लि., एच.एफ. 5. सी. एल. ग्रुप हैद्राबाद एन्डोरेन्स टेक्नॉलॉजी पुणे, व्हॅरॉक इंजिनिअरींग लि. पुणे, न्यू. एच. टालब्रोस लि. पुणे, प्रिसिजन कॅमॉफ्ट लि. सोलापूर यांचा समावेश असून निवड झालेल्या काही विद्यार्थ्यांना २५ ते २८ लाख उत्तम पॅकेज मिळाल्याची माहिती ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट ऑफीसर प्रा. रोहन कुर्री यांनी दिली आहे. ड्ठ विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना आणि विचारांना वाव मिळावा म्हणुन महाविद्यालयाने 'विद्या' या वार्षिक अंकांची निर्मिती केल्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या भावना प्रकट करता आल्या. सदरील वार्षिक अंकास विद्यापीठ स्तरावर उत्तेजनार्थ व लेखांना पारितोषिक मिळाले आहेत. याचबरोबर दरवर्षी इतर कलागुणांना वाव देण्यासाठी नृत्य, गायन, पेंटिंग, रांगोळी, अशा विविध स्पधेर्चे आयोजन वार्षिक स्नेहसंमेलना निमित्त आयोजिले जातात.

विद्यार्थ्यांच्या शारीरीक व बौध्दीक विकासासाठी प्रशस्त क्रिडामैदान असुन यामध्ये क्रिकेट, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, फुटबॉल, खो-खो अशा मैदानी खेळांचा समावेश असुन विविध स्पर्धेचे आयोजन केले जाते. मैदानी खेळासोबत टेबलटेनिस, बॅटमिंटन अशा इनडोअर खेळांच्या सुविधा असुन विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र जीमची व्यवस्था आहे. सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी शैक्षणिक उपक्रमाबरोबर जागतिक पर्यावरणदिन, जलदिन रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण असे विविध कार्यक्रमाचे आयोजन सातत्याने केले जाते, याच बरोबर तंत्रशिक्षण संस्थेचे योगदान ICT चा वापर शैक्षणिक उपक्रमात प्रभावीपणे करता यावा म्हणून जि. प. सोलापुर सोबत विविध कार्यशाळेचे आयोजन, ग्रामीण विद्याथ्यार्साठी कॉप्यूटरचे बेसिक ज्ञान देण्यासाठी विविध कोर्सेस असे उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांना अत्याधुनिक सेवा देण्याच्या दृष्टीने संपुर्ण कॅम्पस वायफाय केले असुन पिण्याच्या शुध्द पाण्यासाठी R. O. प्लॅन्ट बसविले आहे . कॅम्पस मध्ये मेस व कॅन्टीनची व्यवस्था आहे आणि शहारातील सर्व भागातुन कॉलेजला येण्यासाठी अत्यंत माफक दरात कॉलेज बसची सोय करण्यात आली आहे. मुला-मुलींना कॅम्पसमध्ये राहाण्यासाठी माफक फी मध्ये सर्वसोयीयुक्त स्वतंत्र हॉस्टेलची सुविधा आहे. शैक्षणिक वर्ष २०२२ - २३ मध्ये शैक्षणिक अध्यापनाची, सुविधांची विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची उणीव पडू दिली नाही तसेच विद्यार्थ्यांसाठी व प्राध्यपकांचे अध्यापन कौशल्य विकसित होण्यासाठी फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम, वर्कशॉप, सेमिनार, तज्ञाचे मार्गदर्शन अशा विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले . अशा या सर्व उत्तम व अद्ययावत सुविधामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण व संशोधनासाठी असलेले प्रोत्साहन, प्रॅक्टिकल ज्ञानासाठी घेण्यात आलेले परिश्रम यामुळेच व्ही. व्ही. पी. मध्ये अष्टपैलू अभियंते घडतात, यामुळे महाविद्यालय प्लेसमेंटमध्ये अग्रेसर आहे.

अल्पावधीतच नावारूपास आलेले विविधांगी विकास साधणारे विद्या विकास प्रतिष्ठान अभियांत्रिकी महाविद्यालय हे तंत्रशिक्षण सेवेसाठी एक तप पूर्ण करणारे महाविद्यालय ठरले आहे.

**डॉ. उमेश सु. मुगळे**
प्राचार्य, व्ही. व्ही. पी.
अभियांत्रिकी महाविद्यालय,
सोलापूर

# यंत्रमाग कामगार कल्याणकारी मंडळ तत्काळ स्थापन करावे

## आ. प्रणिती शिंदे यांची पावसाळी अधिवेशनामध्ये मागणी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये विधानसभेत आमदार प्रणिती शिंदे यांनी यंत्रमाग कामगार कल्याणकारी मंडळ तात्काळ स्थापन करण्यात यावे याबाबत प्रश्न उपस्थित केला.

महाराष्ट्र राज्यामध्ये जेवढे बांधकाम कामगार आहेत त्यापेक्षा ही जास्त 40 लाखापर्यंत यंत्रमाग कामगार आहेत. ज्यापध्दतीने बांधकाम कामगारांकरीता कल्याणकारी मंडळ स्थापन केले त्याचप्रमाणे 1 टक्का सुटावर घेवून मागील सरकारच्या वेळेस मंडळ स्थापन करण्याकरीता प्रक्रिया पूर्ण झालेली होती. परंतू ते बारगळल. सरकारला यंत्रमाग कामगारांकरीता काही गांभीर्य नाही असे दिसून येते. कारण आपण यंत्रमाग कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यास कधीच पुढाकार घेतलेला नाही. आमदार



प्रणिती शिंदे यांनी मा. मंत्री महोदय यांना विनंती केली की पुढच्या वर्षीच्या आधी आपण यंत्रमाग कामगार कल्याणकारी मंडळ हे महाराष्ट्रात तात्काळ स्थापन झाले पाहिजे याकरीता आपण कोणते पाऊल उचलणार आहात का ?

यासंदर्भात मा. महोदय यांनी सांगितले कि, असंघटीत कामगारांकरीता 39 महामंडळ स्थापन करण्यात येत आहे. यामध्ये निश्चितच यंत्रमाग कामगार कल्याणकारी मंडळाचा समावेश करण्यात येईल असे आश्वासन दिले.

# दोषी लाचखोर लोकसेवकास तात्काळ सेवेतून बडतर्फ करा

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- शासकीय विभागातील अधिकाऱ्यांच्या टेबलावर वजन ठेवल्याशिवाय कामच होत नाही हजारो शासकीय लोकसेवक या भ्रष्टाचारामध्ये अडकलेले आहेत त्यामुळे अशा लोकसेवकास निलंबनाची कारवाई न करता तात्काळ सेवेतून कार्यमुक्त करावे तरच शासकीय कार्यालयामध्ये भ्रष्टाचारास आळा बसेल अशा आशयाचे निवेदन संभाजी ब्रिगेडच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जिल्हाधिकारी मार्फत निवेदन देण्यात आले आहे.

सोलापूरचे नूतन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे संभाजी ब्रिगेड च्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले याप्रसंगी सोलापूर जिल्ह्यातील लाचखोर अधिकारी कर्मचाऱ्याबाबत माहिती दिली असता जिल्हाधिकारी यांनी लवकरच हा प्रश्न गांभीयार्ने घेऊन कडक कारवाई करण्यात येईल



असे आश्वासन दिले.

भ्रष्टाचार हे आपल्या देशाला लागलेली कीड आहे भ्रष्टाचार मुक्त समाज राज्याला प्रगती समृद्धी आणि सुशासनाकडे नेतो त्यामुळे नरेंद्र मोदी यांनी भ्रष्टाचार मुक्त भारत ची घोषणा केली होती त्यानुसार महाराष्ट्र शासनाने भ्रष्टाचार मुक्त महाराष्ट्राच्या वल्गना केल्या पण याच महाराष्ट्रमध्ये वषार्ला हजारो अधिकारी लाचखोरी करताना सापडलेले आहेत यात महसूल शिक्षण पोलीस आरोग्य नगरपालिका नगरपरिषद पंचायत समिती जिल्हा परिषदे चे असे ठिकाणी मोठ्या प्रमाणात लाचेचे प्रकार घडत आहे लाच दिल्याशिवाय सर्वसामान्य नागरिकांचे शेतकऱ्यांचे कोणतेच प्रश्न सुटत नाहीत लाखोंचा पगार घेणारे अधिकारी अशा सर्वसामान्य जनतेची शेतकऱ्यांची आर्थिक लूट करीत आहेत त्यामुळे अशा लाचखोर अधिकाऱ्यांना शासनाने निलंबनाची कारवाई न करता डायरेक्ट घरचा रस्ता दाखवावा व तसेच महिला आयोगाच्या धरतीवर लाच प्रतिबंधक आयोग नेमून तात्काळ दोषीवर कारवाई करण्यात यावी करण्यात यावी अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली आहे

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले उप शहरप्रमुख सिताराम बाबर जिल्हा संघटक रमेश चव्हाण जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र माने तालुकाध्यक्ष बाबासाहेब ननवरे दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष शेखर चौगुले लखन गायकवाड योगेश साठे दत्तात्रय डिंगणे आदी उपस्थित होते.

पान १ वरून

## १० ऑगस्टपर्यंत शिंदे...

निर्णय झाला आहे. तो निर्णय विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर हे एकनाथ शिंदे यांच्या पक्षांतराबाबत निर्णय देतील, तेव्हा अंमलात येईल. त्यामुळे १० ऑगस्ट किंवा त्यापूर्वी एकनाथ शिंदे यांचे निलंबन होईल. त्यानंतर मुख्यमंत्रीपद रिक्त होईल आणि त्याठिकाणी अजित पवार विराजमान होतील. लोकसभा निवडणुकीसाठी भाजपला अजित पवार यांची गरज आहे. वापरा आणि फेकून द्या, नरेंद्र मोदी यांची स्टाईल आहे. एकनाथ शिंदे यांचा वापर करुन झाला आहे, त्यांची उपयुक्तता संपली आहे. आता पुढची उपयुक्तता कोणाची आहे, हे पाहिले जाईल, असे पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले.

**अजितदादा मुख्यमंत्री व्हावेत, ही दिल्लीश्वरांची इच्छाः अनिल पाटील**

अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार उघडउघडपणे मुख्यमंत्रीपदावर दावा सांगू लागले आहेत. अजित पवार हे लवकरच मुख्यमंत्री होतील, असे वक्तव्य अमोल मिटकरी यांनी केले होते. त्यानंतर आता मंत्री अनिल पाटील यांनीही अजित पवार मुख्यमंत्री होणार असल्याचे वक्तव्य केले आहे. गल्लीतील ते दिल्लीतील कार्यकर्त्यांपासून माझ्यासारख्या नेत्याला अजित पवार हे मुख्यमंत्री व्हावेत, असे वाटते. दिल्लीतील नेत्यांनाही हेच वाटते. दिल्लीतील नेते कोण आहेत, हे मला सांगायची गरज नाही. त्यांनाही अजित पवार मुख्यमंत्री व्हावेत, असे वाटते. मुख्यमंत्री होण्यासाठी १४५ आमदारांचा आकडा गाठावा लागतो. तो गाठला गेला की, अजित पवार १०० टक्के मुख्यमंत्री होतील. आता आमच्याकडे तो आकडा नाही. त्यामुळे आता शिंदे साहेबांचं सरकार सुरु आहे. त्यामुळे आता त्यांचाच विचार होईल आणि आम्ही त्यांच्या पाठिशी उभे राहू, असे अनिल पाटील यांनी म्हटले.

## सोलापुर शहर सेवादल यंग ब्रिगेडच्या...

बेरोजगारी वाढली आहे. महागाई गगनाला भिड़ली असून धनधान्य, भाजीपाला, टमाटे, गॅस सिलेंडरचे प्रचंड दर वाढले आहेत. यामुळे जनतेचे हाल होत आहेत महिलांचे बजेट बिगड़ले आहे. म्हणून मोदी सरकारचे निषेध करण्यासाठी आज रोजी सेवादल यंग ब्रिगेडच्या वतीने आंदोलन करण्यात आले.

यावेळी बोलताना प्रदेश सेवादल यंग ब्रिगेड अध्यक्ष सुदीप चाकोते म्हणाले की, महागाई कमी करतो, दरवर्षी दोन कोटी रोजगार देतो यासारख्या अनेक खोटे आश्वासने देऊन सत्तेवर आलेला मोदी सरकार मनमानी कारभार करत असून उद्योगपती धर्जिने धोरणे राबवित असून यामुळे महागाई वाढली आहे. नोटबंदी, GST मध्ये अनेक उद्योग बंद पड़त आहेत त्यामुळे देशात बेरोजगारी वाढत आहे. देशात अशांतता पसरली असून मणिपुर जळत आहे. असे असताना सुद्धा पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्याच तंद्रित आत्ममग्न आहेत. सर्वसमामान्य जनतेच्या हिताकडे त्यांचे लक्ष नाही म्हणून आज रोजी आंदोलन केले आहे.

शहर अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, वरिष्ठ उपाध्यक्ष सुनील रसाळे, मा नगरसेवक विनोद भोसले, तौफीक हत्तूरे, अंबादास बाबा करगुळे, वाहिद बिजापुरे, भीमाशंकर टेकाळे, अँड मयूर खरात, हारुन शेख, नागनाथ कदम, बसवराज म्हेत्रे, अनिल मस्के, प्रवीण वाले, राजेंद्र शिरकुल, संजय गायकवाड़, दिनांनाथ शेळके, रजाक कादरी, भीमाशंकर कूदाळ, नागनाथ वड्डेपल्ली, सुमित सुरवसे, इब्राहिम कलबुर्गी, जब्बार शेख,सलीम शेख, अंजली मंगोडेकर, सुशील म्हेत्रे, करीमनिस्सा बागवान, कालिदास काळपगार, सुभाष वाघमारे, शोभा बोबे, मुमताज तांबोली, सलीम मनुरे, श्रीशैल रणधीरे, रफीक चकोले, शिवशंकर अंजनालकर, मुमताज शेख, सुनीता शेरखाने, दीपक मठ, शोहेब कडेचुर, नागनाथ शावने, सलीमा शेख, शाहु सलगर, उज्वला ढेकळे, बसंती सालुंखे, वासंती भस्मे, स्नेहल शिंदे, बसुअण्णा कोळी, दिनेश जाधव, सिराज मुल्ला, सुनील रोडगे, मुन्निबाई शेख, रेखा बिनेकर, चंदाताई काळे, जकिया पठाण, सुनीता बेरा, लता सोनकांबले, विजयालक्ष्मी झाकने, मनोहर चकोलेकर, यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## श्री क्षेत्र हत्तरसंग कुडल तीर्थक्षेत्र विकास आराखडा शासनाला त्वरित सादर करावा - पालकमंत्री विखे पाटील

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-**जिल्हा प्रशासनाने श्री क्षेत्र हत्तरसंग कुडल तीर्थक्षेत्र विकासासाठी केलेला 173 कोटी 26 लाख 67 हजार 526 रुपयांचा आराखडा शासनाला त्वरित सादर करावा, असे निर्देश महसूल मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. श्री क्षेत्र हत्तरसंग कुडल तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या अनुषंगाने मुंबई येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत पालकमंत्री श्री. विखे पाटील बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, प्र. जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी, कार्यकारी अभियंता दत्तात्रय गावडे, नगर रचना सहायक कल्याण जाधव, भूसंपादन अधिकारी अभिजीत पाटील, मंद्रूप तहसीलदार राजशेखर लिंबारे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री श्री. विखे पाटील पुढे म्हणाले की श्री क्षेत्र हत्तरसंग कुडल तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी आवश्यक असलेली जमीन भूसंपादित करण्यासाठी कार्यवाही करावी. या विकास आराखड्यात किती जमीन आवश्यक आहे, तसेच त्यासाठी किती शेतकऱ्यांची जमीन भूसंपादित करावी लागेल व त्यासाठी द्यावा लागणारा मावेजा याबाबतचाही निधी आराखड्यात प्रस्तावित करावा, असे निर्देश त्यांनी दिले.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

## जाहीर प्रसिद्धीकरण क्रि.कि.अर्ज क्र.:-२९६/२०२३

**मोहोळ येथील मे. ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट वर्ग १ साो, यांचे कोर्टात**

श्री. अभिमन्यु श्रीपती कुंभार, वय-८५ वर्षे धंदा-काही नाही, रा. देगांव (वा.) ता. मोहोळ, जि. सोलापूर. } अर्जदार

**विरूध्द**

देगांव ग्रामपंचायत देगांव, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक, ग्रामपंचायत देगांव, ता. मोहोळ, यांचेवर बजावविण्यात यावी). } सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांची चुलती जानकाबाई गणपती कुंभार, ही दि. ०९/१०/१९९६ रोजी व अर्जदाराचा चुलत भाऊ भगवान गणपती कुंभार ही दि. ०१/०६/२०१० रोजी देगांव (वा.) ता. मोहोळ येथे मयत झालेले आहेत. जानकाबाई ही अर्जदाराचा चुलती असुन भगवान गणपती कुंभार हे. अर्जदाराचे चुलत भाऊ होते. त्यांनी सदर सामनेवाला कार्यालयाकडे मयत चुलती जानकाबाई गणपती कुंभार व चुलत भाऊ भगवान गणपती कुंभार यांच्या मृत्युच्या दाखल्याची मागणी केलेली होती. परंतु सदर सामनेवाला यांनी त्यांच्या अभिलेखात दि. ०९/१०/१९९६ व ता. ०१/०६/२०१० रोजीच्या तारखेनुसार म्हणजे सन १९९६ व २०१० चे संपुर्ण अभिलेख तपासले असता सदर मयत जानकाबाई गणपती कुंभार व चुलत भाऊ भगवान गणपती कुंभार यांच्या मृत्युच्या तारखेची नोंद नमुद नसल्याचे दिसुन आलेले असुन त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवालाचे मृत्यु रजिष्टरला मृत्युची नोंद घेऊन अर्जदार यांना तसे मृत्युप्रमाणपत्र देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करणेबाबत अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाबाबत कोणाची हरकत, आक्षेप असल्यास दि.०१/०९/२०२३ रोजी समक्ष अथवा वकिलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे मुदतीत कोणाची कसलिही हरकत न आल्यास अर्जदारास त्यांचे अर्जात मागणी केलेप्रमाणे मृत्यु दाखले देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. हे जाहिर प्रसिध्दीकरण दिले असे. ता.२०/०७/२०२३.

सही/ क.लिपीक (कोर्टाचा शिक्का) हुकुमावरुन सही/सहा.अधिक्षक फौजदारी न्यायलय, मोहोळ

## जाहीर प्रसिद्धीकरण क्रि.कि.अर्ज नं.:-२९३/२०२३

**मोहोळ येथील मे. ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट वर्ग १ साो, यांचे कोर्टात**

श्री. राहुल नागनाथ वसेकर वय-३७ वर्षे, धंदा- शेती, रा. पाटकुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } अर्जदार

**विरूध्द**

ग्रामपंचायत पाटकुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर (अर्जाची नोटीस ग्रामसेवक, ग्रामपंचायत पाटकुल, यांचेवर बजावविण्यात यावी.) } सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदाराचा मुलगा रुद्र राहुल वसेकर हा मौजे पाटकुल, ता. मोहोळ येथे अर्जदाराचे राहते घरी दि.०१/०१/२०१८ रोजी जन्मलेला आहे. त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत पाटकुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर यांचे जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. अर्जदाराचा मुलगा रुद्र राहुल वसेकर याचे जन्माची नोंद ग्रामपंचायतचे जन्माचे रजिस्टरला व्हावे याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदाराचा मुलगा रुद्र राहुल वसेकर यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत पाटकुल, यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याच्या आत अथवा दि. २९/०८/२०२३ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत म्हणणे न आल्यास अर्जदारास त्यांचे अर्जातील मागणी प्रमाणे पुढील जरुर ते आदेश होतील याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे. ता. २१/०७/२०२३

सही/क.लिपीक, फौजदारी न्यायलय, मोहोळ (कोर्टाचा शिक्का) सही/सहा.अधिक्षक फौजदारी न्यायलय, मोहोळ

## जाहीर प्रसिद्धीकरण क्रि.कि.अर्ज नं.:-२२९/२०२३

**मोहोळ येथील मे. ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट वर्ग १ साो, यांचे कोर्टात**

श्री. बाळु बापू कोळी वय- ३१ वर्षे, धंदा- शेती, रा. येगकी, ता. मोहोळ, जि. सोलापूर } अर्जदार

**विरूध्द**

नगरपरिषद मोहोळ, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मुख्याधिकारी नगरपरिषद मोहोळ, मोहोळ, यांचेवर बजावविण्यात यावी.) } सामनेवाला


ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराचा मुलगा म्हणजेच समर्थ बाळू कोळी याचा जन्म ता. ३०/०९/२०१३ रोजी मौजे मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा मुलगा म्हणजेच समर्थ बाळू कोळी याची जन्म दाखल्याची ता. ३०/०९/२०१३ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे सप्टेंबर २०१३ चे अभिलेखात अर्जदाराचा मुलगा म्हणजेच समर्थ बाळू कोळी याची जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१६/०८/२०२३ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता.२०/०७/२०२३

सही/क.लिपीक, ज्यु. मॅ. वर्ग-१ साो, मोहोळ (कोर्टाचा शिक्का) सही/सहा.अधिक्षक ज्यु. मॅ. वर्ग-१ साो, मोहोळ


# Classified - छोटी जाहीरात

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...



व्यसन + टेन्शन + भिती + चिंता +
नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्अॅप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट




**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नंपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, नागाळा पार्क (कोल्हापूर).**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109




**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## खरीप हंगाम पिक स्पर्धेचे आयोजन

# पिक स्पर्धेत सहभागी होण्याचे कृषी विभागाचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील अधिकाअधिक शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्मिती व्हावी तसेच शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादक्तेबाबत प्रोत्साहन देण्यासाठी पिक स्पधेर्चे आयोजन करण्यात आले आहे.

खरीप हंगाम 2023 मध्ये मूग, उडीद, बाजरी, मका, सोयाबीन, नाचणी(रागी), भात, ज्वारी, ज्वारी, भुईमुग, सुर्यफूल या पिकांचा स्पर्धेमध्ये समावेश करण्यात आला आहे. स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतक-याकडे स्वताच्या नावावर जमीन असणे व ती जमीन तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे. पिकस्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी शेतक-यांकडे संबंधित पिकाखालील किमान 40 आर. (0.40 हेक्टर) सलग क्षेत्रावर लागवड असणे आवश्यक आहे. पिकस्पधेर्साठी तालुका पातळीवर सर्वसाधारण गटातील व आदिवासी गटातील स्पर्धकांचा सहभाग आवश्यक असून त्याकरीता भाग घेण्यासाठी 300 रुपये प्रति शेतकरी प्रति पिक याप्रमाणे प्रवेश शुल्क आकारले जाईल. एक शेतकरी एकापेक्षा अधिक पिकासाठी स्पर्धेत भाग घेऊ शकतात.

पिक स्पधेर्साठी जेवढे अर्ज प्राप्त होतील ते सर्व शेतकरी पिक स्पधेर्साठी पात्र असतील. पिककापणी वरून आलेल्या उत्पादकतेच्या आकडेवारीनुसार त्यांची तालुका, जिल्हा व राज्य पातळीवर निवड केली जाणार आहे. एखाद्या पिकाचे क्षेत्र किमान 1000 हेक्टर असले पाहिजे ही अट काढुन टाकण्यात आली आहे.पीकस्पर्धा मध्ये राज्यस्तरावर प्रथम क्रमांक मिळवलेल्या शेतक-याला पुढील पाच वर्ष त्याच पिकाकरीता पीक स्पर्धेत भाग घेता येणार नाही. पिक स्पर्धेकरीता अर्ज करण्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज, ठरवून दिलेले प्रवेश शुल्क,7/12 व 8 अ चा उतारा जात प्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास) या कागदपत्रांची पुर्तता करावी. पुरेशे अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित पिकाची पिकस्पर्धा संबंधित तालुका कृषि अधिकारी जाहीर करतील. तालुका पातळीवरील स्पर्धेच्या निकालावरून पुढे राज्य व जिल्हास्तरावर बक्षिसे जाहीर केली जाणार आहेत.

तालुका पातळीवरील सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी पहिले बक्षीस 5000 रुपये, दुसरे बक्षीस 3000 रुपये, तिसरे बक्षीस 2000 रुपये आहे. जिल्हा पातळीवर सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी पहिले बक्षीस 10,000 रुपये,दुसरे बक्षीस 7,000 रुपये तिसरे बक्षीस 5,000 रुपये आहे. राज्य पातळीवर सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी पहिले बक्षीस 50,000 रुपये, दुसरे बक्षीस 40,000 रुपये, तिसरे बक्षीस 30,000 रुपये आहे.

शेतकऱ्यांनी सदर पिक स्पर्धेत आपला सहभाग नोंदवावा. खरीप हंगामात उडीद व मुग पिकांसाठी स्पर्धेत अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक 31 जुलै 2023 असून उर्वरित पिकांसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि.31 ऑगस्ट 2023 आहे. अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

# अघोषित त्रुटी पूर्तता शाळांच्या अनुदानाचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार - आ. जयंत आसगावकर



माढा (कटूसत्य वृत्त):- मागील 18 ते 19 वर्षापासून राज्यातील अनेक विनाअनुदानित माध्यमिक विद्यालयांना शासनाचे कसलेही अनुदान मिळाले नाही. हजारों शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर अक्षरशः उपासमारीची वेळ आली आहे.वेळोवेळी अशा विद्यालयांनी अनुदानासाठी शासनाकडे त्रुटींची पूर्तता करून प्रस्ताव सादर केले आहेत परंतु आजतागायत शेकडों माध्यमिक विद्यालये अनुदानापासून वंचित आहेत याबाबत पुणे विभागाचे शिक्षक आमदार जयंत तासगावकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की,राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी चालू अधिवेशनात हा अनुदानाचा प्रश्न मार्गी लावण्या संदर्भात सरकार सकारात्मक असून ज्या अघोषित शाळांनी सर्व त्रुटींची पूर्तता करून शासनाचे सर्व निकष पूर्ण केले आहेत अशा माध्यमिक शाळांना लवकरच अनुदानाचा पहिला टप्पा जाहीर करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेतला जाणार असल्याचे आमदार जयंत आसगावकर यांनी सांगितले आहे.

सन 2001 पासून शासनाने कायम विनाअनुदानित तत्त्वावर राज्यातील हजारो माध्यमिक शाळांना मान्यता देऊन विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय केली त्यानंतर संघटनांनी वेळोवेळी शासन दरबारी प्रयत्न व पाठपुरावा केला तेंव्हा शासनाने कायम शब्द काढून टाकला आहे परंतु त्या ठिकाणी अध्यापनाचे पवित्र कार्य करणारे हजारों शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मात्र शासनाने वा-यावर सोडले आहे.मागील 18 ते 19 वर्षापेक्षा जास्त कालावधी लोटला आहे अशा विनाअनुदानित माध्यमिक विद्यालयात काम करणारे शिक्षक शासनाच्या अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत.काही शिक्षक तर अक्षरशः सुट्टीच्या दिवशी बाहेर मोलमजुरी करून प्रपंच चालवत आहेत तरीही शासनाने काही शाळांना अनुदानाचा पहिला टप्पा सुद्धा जाहीर केला नाही. काही शिक्षकांची सेवा समाप्तीची वेळ आली आहे तरी शासन प्रामाणिकपणे काम करणाऱ्या हजारों शिक्षकांचा विचार करीत नाही ही बाब अतिशय गंभीर आणि चिंताजनक आहे. शासनाचे असे एकही दुसरे खाते नाही की ज्या ठिकाणी 18 ते 19 वर्षे कर्मचारी मोफत सेवा बजावत आहे. जे शिक्षक देशाची भावी पिढी घडविण्याचे काम करीत आहेत त्यांना अनुदान न देता शासन त्यांच्या सहनशक्तीचा अंत पाहत आहे ही वस्तुस्थिती आहे तेंव्हा विधानसभेच्या चालू अधिवेशनात शासनाने अघोषित त्रुटी पूर्तता केलेल्या माध्यमिक शाळांना लवकरात लवकर अनुदान जाहीर करावे अशी मागणी आजतागायत विनावेतन काम करणाऱ्या शेकडों शिक्षकांमधून होत आहे.

ऑक्टोंबर 2005 नंतर शासकीय सेवेत रुजू झालेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांना पूर्वीप्रमाणे जुनी पेन्शन योजना लागू करावी.यासाठी शिक्षकांनी शासनाकडे वेळोवेळी मागणी व पाठपुरावा केला आहे. सनदशीर मार्गाने मोर्चे व आंदोलने केली परंतु शासनाने वेळोवेळी वेळकाढूपणा केला आहे. संप व आंदोलनाची तीव्रता कमी करण्यासाठी नुसती आश्वासने दिली आहेत परंतु आजतागायत तो प्रश्न शासनाने सोडवला नाही त्यामुळे शिक्षकांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे.इतर राज्यात शिक्षक व इतर शासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू केली आहे मग महाराष्ट्रात का लागू होत नाही? असा संतप्त सवाल शिक्षकांमधून उपस्थित केला जात आहे. जर शासनाने तातडीने जुनी पेन्शन योजना लागू केली नाही तर आगामी निवडणुकीत त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील असा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

# डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेच्या बार्शी शाखेचा अभिनव उपक्रम



**बार्शी,(कटूसत्य वृत्त):-** निसर्गामध्ये होणारे बदल, पावसाचा अवेळीपणा, अपुरा पाऊस, बियाणे, खते, औषधाचे वाढते दर यामुळे शेतकरी अगोदरच अडचणीमध्ये सापडलेला आहे. बळीराजाला संकटातून बाहेर काढण्यासाठी, शेतकऱ्यांना दिलासा मिळावा या हेतूने, मोदी सरकारने प्रधानमंत्री खरीप हंगाम पिकाविमा 2023 या योजनेसाठी नाममात्र 1 रुपया नोंदणी फी आकारणी केली आहे. जास्तीतजास्त शेतकऱ्यांना याचा लाभ मिळावा, यासाठी पीकविमा नोंदणी आवश्यक आहे. डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेच्या वतीने, शासनाच्या योजना शेतकऱ्यांच्या दारापर्यंत पोचवून, शेतकऱ्यांसाठी मोफत पीकविमा नोंदणी शिबिराचा उपक्रम स्तुत्य असून, बार्शी तालुक्यातील आगळगाव येथे घेण्यात येत असलेला हा उपक्रम महाराष्ट्र राज्यातील पहिलाच उपक्रम असल्याचे प्रतिपादन यावेळी कार्यक्रमाचे उदघाटक आमदार राजेंद्र राऊत यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरुवात आगळगावचे ग्रामदैवत श्री विठ्ठल रुक्मिणी व श्री भगवंत यांचे पूजन करून तर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. याप्रसंगी तालुका कृषी अधिकारी संतोष कोयले यांनी कृषी विभागाच्या विविध शासकीय योजनांची माहिती उपस्थित शेतकऱ्यांना दिली.

# आई-वडिलांचे नाव उज्वल करण्यासाठी प्रयत्नशील राहा: हंकारे



मोहोळ (कटूसत्य वृत्त):- विद्यार्थ्यांनो बुद्धीने कमी असेल तर चालेल परंतु मनानी सशक्त असणे गरजेचे आहे.जगात सर्वात जास्त प्रेम आपल्यावर कोण करत असेल तर त्याचे नाव आई आणि वडील आहे. विद्यार्थी व विद्यार्थिनीने आपल्या जीवनामध्ये आपण कुठलेही कृती किंवा काम करत असताना ज्या आई-वडिलांनी आपल्यासाठी परा कष्ट घेऊन जपले असते त्या आई-वडिलांना शरमेने मान खाली घालावी लागेल असं वागू नका असे आवाहन व्याख्याते वसंत हंकारे यांनी केले. मोहोळ शहरातील नेताजी प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयच्या वतीने अकरावी विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ आणि पालक विद्यार्थी शिबिराचे आयोजन संस्थेचे चेअरमन डॉ. एम ए गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली मोहोळ येथे नागनाथ मंगल कार्यालय येथे करण्यात आले होते.व्याख्याते वसंत हंकारे आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव या विषयावर व्याख्यान देऊन करण्यात आले. यावेळी इंजिनीयर कराळे, लोकमंगल पतसंस्थेचे संचालक युवराज गायकवाड, माजी क्रीडा शिक्षिका सिंधू दळवे, प्राचार्य दत्तात्रय काशीद, प्रा. डॉ मुकुंद गायकवाड, सहशिक्षक डॉ.श्रीधर चव्हाण, श्रीमती सविता गादेकर, विजय घाडगे,सत्यपा जामगुंड, घोडके, कुलदीप देशमुख, सुलक्षणा तिकटे, समाधान शेळके,समाधान मोटे, पल्लवी चांदणे, दत्तात्रय कोळेकर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक घनश्याम दळवी यांनी केले.

# अंजनगाव (खेलोबा) परिसरात पावसाची जोरदार हजेरी



**माढा (कटूसत्य वृत्त):-** अंजनगाव(खेलोबा) गावच्या परिसरात सोमवारी दुपारी पावसाने जोरदार हजेरी लावली. अनेक दिवसांपासून पावसाच्या प्रतिक्षेत असलेल्या शेतकर्यांना या पावसामुळे दिलासा मिळाला आहे.अंजनगाव भागातच पाऊस झाला, इतर भागात मात्र पाऊस झालेला नाही.

# जिल्ह्यात पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झाल्यास भारतीय जैन संघटना मदतीस तयार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टीमुळे पूरग्रस्त परिस्थिती निर्माण होत आहे, आपल्या सोलापूर जिल्ह्यात तशी कोणतीही परिस्थिती निर्माण झाल्यास सर्व 11 तालुक्यामध्ये भारतीय जैन संघटनेचे कार्यकर्ते व पदाधिकारी तन, मन धनाने शासना सोबत मदत कार्य करण्यास तयार आहे अशी लेखी हमी आज नूतन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना त्यांच्या सत्कारा समयी राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य केतनभाई शहा व इतर पदाधिकारी यांनी दिली.

केंद्र,राज्य व स्थानिक प्रशासना सोबत अनेक लोकोपयोगी कार्य हे भारतिय जैन संघटनांने केले व करत आहे. जशे की किल्लारी भूकंप, पाणी फौंडेशन, मूल्यवर्धन, सुजलाम सुफलाम, जलयुक्त शिवार, स्मार्ट गर्ल, कोविड कालातील मदत, आत्महत्या केलेल्या शेतकर्यांची मुले दत्तक घेणे, कोविड मधील पालकत्व गमावलेली मुले संभाळणे, गलमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अशी अनेक कार्य शाशनास मदतरुपी केलेली आहे.

नूतन जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांचा शाल, मोतिमाळा व नेपकीन बुके देऊन सत्कार करण्यांत आला ह्या वेळेस केतनभाई शहा, विशाल मेहता, सौ माया पाटील, विक्रांत बशेट्टी, सौ प्रिया शहा, चंद्रकांत मिराखोर, सौ स्नेहा वनकुद्रे, मुख्य कार्यालयातून वाघमारे ई उपस्थित होते.

# मणिपूर घटनेच्या निषेधार्थ सोलापूरात MIM चे आंदोलन



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- मणिपूर येथे घडलेल्या अत्याचाराविरुद्ध निषेध नोंदविण्यासाठी टक्ट च्या वतीने आंदोलन करण्यात आले यासह वीज दरवाढ कमी करावी, सेतू सुविधा केंद्रात दाखले त्वरित मिळावेत, वक्फ बोर्ड कडक करावा, अशा मागण्या या आंदोलनातून करण्यात आल्या. फारुक शाब्दी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात सरचिटणीस कोमारो सय्यद, माजी नगरसेवक गाझी जहागीरदार, अझहर हुंडेकरी, इसामुद्दीन पिरजादे, वाहेदा भंडाले, नसीमा कुरेशी, मोईन शेख, याकूब एम आर, मुस्ताक कानकुर्ती, राजा बागवान, इब्राहिम लालकोट, कमरुल शेख, मोसिन मैंदर्गी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते सह महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

यावेळी अध्यक्ष फारूक शाब्दी, कोमारो सय्यद, वाहेदा भंडाले, नसीमा कुरेशी, अझहर हुंडेकरी, गाजी जहागीरदार यांची भाषणे झाली. सर्वांनी मोदी सरकार व मणिपूर सरकारचा निषेध नोंदवला, महिलांनी तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मुली नाहीत, महिलांच्या समस्या, दुःख तुम्हाला कधी कळणार असा प्रश्न उपस्थित करत आम्हाला आता रिव्हॉल्वर जवळ ठेवण्याची परवानगी द्या अशी जोरदार मागणी केली.

# संशोधनाची उत्पादकता वाढवणे ही काळाची गरज- कुलगुरू डॉ.राजनीश कामत



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** संशोधनाची उत्पादकता वाढणे ही काळाची गरज असून संशोधकांनी विविध आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा टूल्स चा वापर करणे क्रम प्राप्त झाले आहे. मानवी प्रज्ञेला तोड नसून आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा सुनियोजित वापर करणे अत्यावशक बनले आहे असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.राजनीश कामत यांनी केले. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात जेष्ठ संशोधक डॉ.एस.एच.पवार लिखित पुस्तकाचे प्रकाशन सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून डॉ.राजनीश कामत यावेळी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संजय नवले कॅम्पस डायरेक्टर सिंहगड इन्स्टिट्यूट सोलापूर, जेष्ठ संशोधक डॉ. एस. एच. पवार, डॉ. शंकर नवले प्राचार्य सिंहगड महाविद्यालय सोलापूर , निखत शेख प्राचार्य सिंहगड पब्लिक स्कूल सोलापूर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या प्रास्तविकात डॉ. शंकर नवले यांनी जेष्ठ संशोधक डॉ. एस. एच. पवार लिखित नोव्हा पब्लिशर्स यूएसए प्रकाशीत सिल्क फायब्रोईन : अॅडव्हान्ससेस ईन अॅप्लिकेशन्स अॅंड रीसर्च या पुस्तकाबद्दल माहिती दिली. पुढे बोलताना डॉ. कामत म्हणाले की संशोधन आणि तंत्रज्ञान ह्या दोन्ही गोष्टी परस्परपूरक आहेत. डॉ. एस. एच. पवार यांच्यासारख्या जेष्ठ संशोधकामुळे तरुण पिढीमध्ये संशोधनाबद्दल आवड निर्माण झाली आहे. डॉ. एस. एच. पवार यांचे संशोधनातील योगदान थक्क करणारे आहे. डॉ.पवार सरांमुळेच संशोधनाच्या अनेक संधी मला प्राप्त झाल्या.यावेळी त्यांनी यांच्यासोबतच्या आठवणी जागवल्या.

डॉ. पवार बोलताना म्हणाले सिल्क फायब्रोईन मुळे यावर लिहलेल्या पुस्तकांमुळे सिल्क सायन्स आणि टेकनॉलॉजीला नवे परिमाण प्राप्त झाले आहे. या पुस्तकामुळे नवसंशोधकांना पर्वणी मिळणार आहे.

# धर्माजी भोसले नावाप्रमाणेच धर्मात्मा होते : चेतन नरोटे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे माजी सरचिटणीस व सोलापूर शहर काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष स्व.धर्माजी रामकृष्ण भोसले यांच्या ६३ व्या जयंती निमित्त काँग्रेस भवन येथे त्यांचे चिरंजीव मा. नगरसेवक विनोद भोसले, अमोल भोसले यांच्या उपस्थितीत सोलापुर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे यांच्या हस्ते स्व. धमार्जी भोसले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी बोलताना चेतनभाऊ नरोटे म्हणाले की, धर्माजी भोसले हे काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत होते. आपल्या कार्यकर्तुत्वावर १९७८ पासून काँग्रेसच्या विद्यार्थी संघटना, युवक काँग्रेस, सेवादल, इंटक, कामगार कल्याण मंडळ आणि शहर अध्यक्ष म्हणून सलग बारा वर्षे काम, नगरसेवक, प्रदेश सरचिटणीस अश्या विविध पदावर जवळपास चाळीस वर्षे काँग्रेस पक्षाचे काम करून त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक निवडणुका लढविल्या आणि जिंकल्या एका गिरणी कामगाराचा काँग्रेसचा अध्यक्ष असे फक्त काँग्रेस मध्येच होऊ शकतो. काँग्रेस भवन हे त्यांचे दूसरे घर होते. स्व. धर्माजी भोसले यांनीही आयुष्यभर समाजकारण, राजकारण, कामगार क्षेत्राच्या माध्यमातून गोरगरीब जनता, मिल कामगारांची यांची सेवा केली. अनेकांना नोकरीला लावले. आयुष्यभर त्यांना गरजुंना सढ़ळ हाताने मदत केले. स्व. धर्माजी भोसले हे नावाप्रमाणेच धर्मात्मा होते. माणसं जोडणारा, प्रत्येकाच्या मनामनात माणुसकी जपणारा धर्माजी भोसले अशी त्यांची प्रतिमा कायमस्वरूपी प्रत्येकाच्या मनात राहील.

शहर अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, कार्याध्यक्ष संजय हेमगड्डी, प्रदेश चिटणीस किसन मेकाले, वरिष्ठ उपाध्यक्ष सुनील रसाळे, माजी महिला अध्यक्ष हेमाताई चिंचोळकर, मा नगरसेवक विनोद भोसले, तौफीक हत्तूरे, अंबादास बाबा करगुळे, वाहिद बिजापुरे, देवाभाऊ गायकवाड, भीमाशंकर टेकाळे, अशोक कलशेट्टी, अमोल भोसले, अँड मयूर खरात, हारुन शेख, नागनाथ कदम, हनमंतु सायबोलू, बसवराज म्हेत्रे, अनिल मस्के, प्रवीण वाले, राजेंद्र शिरकुल, दिनांनाथ शेळके, दाऊद नदाफ, पृथ्वीराज नरोटे, सोहेल शेख, सुमन जाधव, विनाताई देवकते, शिल्पा चांदने, अंजली मंगोडेकर, करीमनिस्सा बागवान, कालिदास काळपगार, सुभाष वाघमारे, शोभा बोबे, मुमताज तांबोली, सलीम मनुरे, श्रीशैल रणधीरे, शिवशंकर अंजनालकर, मुमताज शेख, समीर काझी, सुनीता शेरखाने, जितराज गरड़, शोहेब कडेचुर, नागनाथ शावने, सलीमा शेख, शाहु सलगर, उज्वला ढेकळे, बसंती सालुंखे, वासंती भस्मे, स्नेहल शिंदे, बसुअण्णा कोळी, दिनेश जाधव, सिराज मुल्ला, सुनील रोडगे, मुन्निबाई शेख, रेखा बिनेकर, चंदाताई काळे, जकिया पठाण, सुनीता बेरा, लता सोनकांबले, मनीषा भोसले, विजयालक्ष्मी झाकने, मनोहर चकोलेकर, अजिंक्य गायकवाड़, महेंद्र सिंग, रफीक चकोले, सुशिला म्हेत्रे, जयश्री स्वामी, सलीमा शेख, अफरोज तांबोली, दौपदी शिवशरण यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# माढा नगरपंचायत ची रखडली १ कोटी २६ लाखांची थकबाकी, नव्या सिईओ पुजा दुधनाळे कर वसुली साठी काय फंडा राबविणार?

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा नगरपंचायत ची शहरवासियांकडे १ कोटी २६ लाख इतकी मालमत्ता कर बाकी रखडलेली आहे.

नव्याने रुजु झालेल्या मुख्याधिकारी पुजा दुधनाळे रखडलेल्या थकबाकी प्रश्नी कोणता फंडा राबविणार हे देखील पाहणं तितकचं महत्वाचे असणार आहे.

नगरपंचायत चे करबाकी वसुलीचे प्रमाण अतिशय कमी असुन माढा नगरपंचायतची १० एप्रिल ते ११ जुलै २०२३ पर्यतची आकडेवारीनुसार नगरपंचायतची शहरातील नागरींकाकडे १ कोटी २६ लाखांची थकबाकी आहे.यापैकी ५ लाख ५७ हजारांची करबाकी वसुली झाली असुन वसुलीचे प्रमाण ३.४३ टक्के इतके आहे.तर ६८ लाख ४० हजार इतकी पाणी पट्टीची थकबाकी रखडली असुन यापैकी २ लाख ७१ हजारांची वसुली झाली आहे त्याचे प्रमाण ३.२२ टक्के इतके आहे.

**वसुलीसाठी उतारा देण्यास नकार**

नगरपंचायत प्रशासन शहरातील नागरिकांना उताऱ्यासह अन्य कागदपत्रे हवी असल्यास थकबाकी भरल्या खेरीज उतारे व संबधित कागदपत्रे दिली जात नसुन काही नागरीक मात्र करबाकी भरताना पहायला मिळत आहेत.

शहरवासियांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी नगरपंचायत प्रशासनाला मालमत्ता कर भरणे आवश्यक असते.मात्र नगरपंचायत प्रशासन करवसुलीत बॅक फुट वर असल्याचे आकडेवारीनुसार समोर आले आहे.माढा शहराला पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन वारंवार फुटत असल्याने सुरळीत पाणी पुरवठा करण्यास अडथळे निर्माण होत आहेत. पाणी पुरवठ्याच्या पाईपलाईन च्या गळती काढण्याचे काम हे नफा फंडातूनच करावे लागत आहे.पाणी पुरवठ्यासह अन्य मुलभूत कामे करण्यासाठी थकबाकी वसुलीसाठी नगरपंचायत प्रशासनाने कंबर कसणे महत्वाचे ठरणार आहे.रुजु होताच प्लॅस्टिक बंदी विरोधात व्यापाऱ्यांकडून आर्थिक दंडाची कारवाई करण्याचे पाऊल पहिले पाऊल टाकणाऱ्या मुख्याधिकारी पुजा दुधनाळे थकित मालमत्ता करबाकी वसुली प्रश्नी काय आणी कोणती ॲक्शन घेतील हे पाहणे देखील तितकंच महत्वाचे ठरेल.

# मराठा तरूण उद्योजकांना न्याय मिळावा : आ. रणजितसिंह मोहिते-पाटील



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** मराठा समाजातून उद्योजक निर्माण व्हावेत,तरुणांनी नवीन व्यावसाय सुरू करून रोजगार निर्मिती करावी यासाठी सन २०१८ मध्ये अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. महामंडळाच्या स्थापनेपासुन ४३,१९५ गरजुंना पात्रता प्रमाणपत्र (छडक) निर्माण झाले मात्र त्यापैकी १८,६०३ लाभार्थ्यांना बँकांनी कर्ज मंजुर केले आहे.आर्थिक विकास महामंडळामार्फत मराठा समाजातील नव उद्योजकांना कर्ज मिळण्यास अनेक अडचणींचा सामना करवा लागत आहे. महामंडळामार्फत देण्यात येणाऱ्या कर्ज प्रकरणी बँका टाळाटाळ करत आहे,

अशा विविध समस्यांचे निवारण करावे व मराठा समाजातील तरूण उद्योजकांना न्याय देण्यात यावा म्हणून आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी सभागृहात प्रश्न उपस्थित केला.

या वेळेस आ.रणजितसिंह मोहिते-पाटील म्हणाले, मराठवाडातील ३३, ७४० बेरोजगारांनी महामंडळाकडे ऑनलाईन अर्ज दाखल केले होते, परंतु पैकी ५० टक्केपेक्षा अधिक अर्ज विविध बँकांनी तारण व २ गॅरेंटरची अट टाकून निकाली काढल्याने बेरोजगारांना मदत होऊ शकली नाही,

महामंडळामार्फत देण्यात येणाऱ्या कर्ज प्रकरणी बँका कर्ज मंजुरी देताना टाळाटाळ करीत आहेत अशा सदरील बँकावर कारवाई करून अशा बेरोजगार युवकांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने त्यांच्या कर्जांना तारण व गॅरंटी देण्याबाबत उपाय योजना करावी म्हणून आ.मोहिते-पाटील यांनी मागणी केली.

आ.मोहिते-पाटील यांच्या प्रश्नाला शासनाकडून उपमुख्यमंत्री अजित पवार उत्तर देताना म्हणाले महामंडळामार्फत लाभार्थ्यांना कर्ज वितरित करण्यात येत नसून लाभार्थ्यांनी त्यांच्या व्यावसाया करीता बँकेकडून घेतलेल्या कर्जावरील व्याज परतावा महामंडळाकडील लाभार्थ्यांना दिला जातो या संदर्भात प्रति वर्षी महाराष्ट्रातील विविध बँकेकडून सरासरी एकूण १३,३०० प्रकरणे मंजूर करण्यात येतात..

बेरोजगार युवकांना प्रोत्साहान देण्यासाठी त्यांना बँकांमार्फत कर्ज मिळावे यासाठी महामंडळ जिल्हा समन्वयक यांच्या संख्येमध्ये वाढ करुन लाभार्थी व बँक यांच्यात समन्वय वाढविण्यासाठी प्रयत्न करत असून वेळोवेळी जिल्हाधिकारी व बँकर्स यांची उपस्थितीत बॅकर्स व लाभार्थी यांच्यामध्ये संवाद घडवून आणून, आढावा बैठका घेवून, कर्ज वितरणासाठी येणाऱ्या अडचणींची निराकरण करण्यात येत असून केंद्र शासनाच्या CGTMSE व CGFMU या योजनांतर्गत लाभार्थ्यांच्या कर्जावरील क्रेडिट गैरैंटी इन्सूरन्स प्रिमियम रक्कम भरणा केल्या नंतर सदर रक्कम महामंडळामार्फत लाभार्थ्यांच्या खात्यात मागणी प्रमाणे जमा करण्यात येत असल्याचे असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून सांगण्यात आले.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत मराठा समाजातील नव उद्योजकांना मदतीचा हात देण्यासाठी बँकतर्फे स्वतःचा व्यवसाय सुरु करण्यासाठी किंवा वाढविण्यासाठी कर्ज पुरविले जाते. त्या कर्ज रक्कमेवरील व्याज परतावा हा आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत केला जातो. म्हणजे लाभार्थास बिनव्याजी कर्ज उपलब्ध होण्याच्या दृष्टिकोनातून अण्णासाहेब पाटील मराठा कर्ज योजना सुरु करण्यात आली.

राष्ट्रीयकृत बँकांकडुन महामंडळाच्या लाभार्थ्यांना कर्ज मिळण्यासाठी मुख्यमंत्री व अर्थमंत्री यांच्यासमवेत संयुक्त बैठक घेवुन कर्ज वितरणासाठी येणार्या अडचणीवर मार्ग काढण्याचा प्रयत्न करणार असुन या योजनेकरिता राज्यसरकारला SCBC कोड जनरेट करण्यासाठी विनंती करणार आहे. त्यामुळे किती लार्भाथ्यांची कर्जप्रकरणे मंजुर झाली व किती कर्ज प्रकरणे प्रलंबित आहेत यांची माहिती मिळणार आहे.

**- नरेंद्र पाटील**
अध्यक्ष आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ

# मणिपूर मध्ये सैतानी कृत्य करणाऱ्या शेकडो नराधमांना फाशी द्या ! - आडम मास्तर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** हिंसाचारग्रस्त मणिपूरमधील महिलांवरील अत्याचाराची एक घृणास्पद घटना मागील शनिवारी उघडकीस आली. या घटनेत जमावाने २१ आणि २४ वर्षे वयाच्या दोन कुकी-झोमी आदिवासी तरुणींचे अपहरण करून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार केले आणि नंतर त्यांची हत्या केली होती.त्यांच्या डोळ्यादेखत त्यांच्या भावाची आणि वडिलांची क्रूर हत्या करण्यात आली. हे सैतानी कृत्य माणुसकीला काळीमा फासणारे असून मणिपूर मधील 800 च्या वर नराधमांना फाशीची शिक्षा द्यावी अशी संतप्त प्रतिक्रिया कामगार नेते माजी आमदार आडम मास्तर यांनी व्यक्त केली. लाल बावटा विडी कामगार संघटना आणि जनवादी महिला संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने कॅप्टन लक्ष्मी सहगल आणि विमलताई रणदिवे यांच्या स्मृतिदिनानिमित्त तसेच कॉ.अहिल्याताई रांगणेकर यांच्या जयंतीनिमित्त मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या दत्तनगर येथील मध्यवर्ती कार्यालयात विडी कामगारांचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला होता. पुढे बोलताना म्हणाले विडी कामगारांच्या या मेळाव्यात आडम मास्तरांनी सोलापुरातील हजारो विडी कामगारांच्या सद्यपरिस्थितीवर भाष्य केले. विडी कामगारांना किमान वेतन देण्याच्या कारणावरून विडी कारखानदारांनी कारखाने बंद करण्याची धमकी दिली मात्र कारखाने बंद झाल्यास नुकसान भरपाई म्हणून दहापट दंड वसूल करण्यासाठी लालबावटा विडी कामगार संघटना सुप्रीम कोर्टात जाईल असा इशाराही आडम मास्तर यांनी दिला. यात्रसंगी उपस्थित असलेले सीटूचे महासचिव एडवोकेट कॉ. एम.एच. शेख यांनी उपस्थित महिला कामगारांना मार्गदर्शन केले. एम एच शेख सरांनी मणिपूर घटनेचा उल्लेख करताना केंद्र सरकारवर ताशेरे ओढले. केंद्रामध्ये आणि मणिपूरमध्ये बीजेपीची सत्ता असताना देखील मनिपुरमधील हिंसा रोखण्यासाठी भाजप सरकारला यश आले नाही. याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. विडी कामगार महिलांना संबोधित करताना एम एच शेख यांनी किमान वेतन देण्याची मागणी केली. येत्या काळात विडी कारखानदारांच्या विरोधात सह्यांची मोहीम सुरू करण्यात येणार आहे, परंतु कारखानदार ही सह्यांची मोहीम हूसकावून लावण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यासाठी कॅप्टन लक्ष्मी सहगल, विमलताई रणदिवे आणि अहिल्याताई रांगणेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन विडी कामगारांनी कारखान्यातील अरिष्ट व जाचक प्रथा बंद करण्यासाठी प्रतिज्ञा घ्यावी असे आवाहन कॉम्रेड एम एच शेख यांनी केले. मेळाव्याच्या सुरुवातीला तिन्ही रणरागिणींच्या प्रतिमेला माजी नगरसेविका शेवंता देशमुख आणि सुनंदा बल्ला यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मेळाव्याचे प्रास्ताविक रे नगरचे सचिव कॉम्रेड युसुफ शेख मेजर यांनी केले. युसुफ मेजर म्हणाले विडी कामगारांना हक्काची घरे देण्यात आम्ही यशस्वी झालो आता लाल बावटा विडी कामगार संघटनेच्या माध्यमातून महिला विडी कामगारांना किमान वेतन देण्यासाठी आम्ही वज्रमूठ आवळली आहे. यात्रसंगी जनवादी महिला संघटनेच्या अध्यक्षा नसीमा शेख यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. त्या म्हणाल्या विडी कामगारांबद्दल विधानसभेत कुणीही आवाज उठवायला तयार नाही. विडी कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडायची असेल तर येत्या विधानसभा निवडणुकीत आडम मास्तरांना विधानसभेत पाठवणे गरजेचे आहे. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी माजी नगरसेविका सुनंदा बल्ला या होत्या यात्रसंगी विचार मंचावर कॉम्रेड नरसय्या आडम,एम.एच.शेख,युसुफ मेजर,शेवंता देशमुख, लिंगवा सोलापुरे, शकुंतला पाणीभाते आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इलियास सिद्दिकी यांनी केले. यात्रसंगी पक्ष कार्यालयाचे सभागृह महिलांनी खचाखच भरले होते. बाहेरच्या आवारात पुरुषांना बसण्याची व स्क्रीनची सोय करण्यात आली होती.

# जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर यश संपादन करता येते - नूतन PSI जहीर शेख



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** एम.पी एस.सी परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेले झहीर शेख तसेच गणेश कसबे यांचा युवा जागृती मंच च्या वतीने सत्कार करण्यात आला. या सत्काराच्या वेळी नूतन पीएसआय जाहीर शेख असे म्हणाले की मेहनतीच्या पुढे परिस्थितीला हात टेकावे लागतात. माज्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती, परंतु मी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर यश संपादन केले तसेच अनेक युवक परिस्थिती पुढे हात जोडतात परंतु परिस्थितीवर मात करून आपण आयुष्यात यश संपादित करू शकतो. या वेळी युवा जागृती मंचाचे संस्थापक ॲड. आकाश कापुरे, राहुल कसबे, ॲड. अक्षय राऊत ॲड. शुभम मोठे, भैय्या कांबळे सागर रोकडे ,आनंद अवचारे आदि जन उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरी सरवदे यांनी केले तर आभार संजय लोंढे यांनी केले.

# करकंब गाव हरीत करण्यासाठी करकंब गावच्या लेकीचं झाड अभियान टीमच्या वतीने वृक्षारोपण सुरु



**करकंब (कटूसत्य वृत्त):-** करकंब येथे गेल्या दोन वर्षापासून करकंब गावच्या लेकीचं झाड अभियान टीमच्या वतीने ४५० वृक्षारोपण करुन झाडांची जोपासना करण्याच काम अखंड आणि सातत्याने चालू असून याही वर्षी करकंब मोडनिंब रोडवर २००भारतीय जातींच्या झाडांची वृक्षारोपणाची मोहीम सुरू केली असून यामध्ये वड,पिंपळ,लिंब, जांभूळ,करंज,बकुळ आदी झाड लावण्याची काम सुरू आहे, यासाठी पुणेस्थित करकंबकर यांची अनमोल अर्थिक सहकार्य भेटल्यामुळे करकंब गाव हरीत होण्यासाठी मोठी मदत होणार आहे,तसेच करकंब गावच्या लेकीचं झाड अभियान टीमच्या वतीने अभिनव उपक्रम म्हणजे करकंब गावभागात अंगणात आणि सभोवतालच्या परिसरात झाड लावायचे असेल तर उपलब्ध करून देण्यात येत आहे, पाहिजे त्याला झाड, आणि तेही आवडीच त्यासाठी एक अट आहे एक खड्डा खणून द्यायचा आणि झाड जोपासण्याची जबाबदारी घ्यायची, यासाठी करकंबकरांनी प्रतिसाद सुरुवात केली आहे,तसेच करकंब ग्रामपंचायतीच्या वतीने ही झाड आणि ट्रीगार्ड उपलब्ध करून देण्यात आली आहेत त्याही झाडांची जबाबदारी लेकीच झाड टीमने घेतली असून यावर्षी पासून लएकईबरओबर सुनेचं झाड,आईचं झाड,वडीलांच झाड, आजीच झाड आजोबांचं झाड आणि वाढदिवसाच्या निमित्ताने ही झाड लागणार असून ज्यांना ज्यांना आपली आठवण म्हणून झाड लावायचे असेल त्यांनी 9767776858 या मोबाईल नंबर वर संपर्क साधावा, करकंब गावहरीत करण्यात बरोबर एकलव्य अभ्यासिका,जागर स्वच्छता अभियान टीमच्या वतीने ही शैक्षणिक आणि पर्यावरणाच्या रक्षणासाठी काम सर्वाच्या सहकायर्ने चांगल्या प्रकारे होत असून सर्व तरुण वृक्षप्रेमी यांच अनमोल सहकार्य लाभत आहे.भविष्यकाळात करकंब गाव हरीत करण्यासाठी सर्व ग्रामस्थांनी सहभागी होऊन सहकार्य करावे असे आवाहन करकंब गावच्या लेकीचं झाड अभियान टीमच्या वतीने करण्यात येत आहे.करकंब गाव हरीत करण्यासाठी करकंब गावच्या लेकीचं झाड अभियान टीम यासाठी अधिक परिश्रम घेत आहे.

# राज्यकर उपआयुक्त कार्यालयातील रद्दी लिलाव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वस्तू व सेवा कर कार्यालय सोलापूर येथील नष्टीकरणास पात्र अभिलेख नष्टीकरण करून निर्माण झालेल्या रद्दीचे दर पत्रक पध्दीने लिलाव विक्री करावयाची आहे. त्यासाठी इच्छुक व्यक्ती अथवा व्यापारी यांच्याकडून दर प्रति किलो पध्दतीने दर पत्रक मागविण्यात येत आहे. पात्र अभिलेख नष्टीकरण करून निर्माण झालेल्या रददीचे दर पत्रक बंद लखोटयात समक्ष दिनांक 07 ऑगस्ट 2023 रोजी दुपारी 04.00 वाजेपर्यंत कॅबिन क्र.103, पहिला मजला राज्यकर उपायुक्त (अध्यक्ष अभिलेख नष्टीकरण समिती) वस्तू व सेवाकर कार्यालय, सोलापूर यांच्याकडे पाठवावेत सदर नष्टीकरण पात्र अभिलेख (रद्दी) बघण्याची व्यवस्था या कार्यालयात दि. 07ऑगस्ट 2023 रोजी सकाळी 11.00 वाजेपर्यत केलेली आहे. प्राप्त दरपत्रके दिनांक 9 ऑगस्ट 2023 रोजी सकाळी 11.00 वाजता राज्यकर उपायुक्त SOL-VAT-ए-003 (अध्यक्ष, अभिलेख नष्टीकरण समिती) कॅबिन क्र.103 पहिला मजला, वस्तू व सेवा कर कार्यालय, सोलापूर यांच्या दालनात उघडण्यात येतील.

# मंगळवेढा तालुक्यात चाराछावणी व चाराडेपो सुरु करा - आ आवताडे यांची अधिवेशनात मागणी



**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** पावसाने अपेक्षेप्रमाणे हजेरी न लावल्याने पिण्याच्या व जनावरांच्या पाण्याचा आणि चाऱ्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. संपूर्ण राज्यातील विविध भागांमध्ये पूर-महापूर यांनी थैमान घातले असताना मंगळवेढा तालुक्यामध्ये मात्र या उलट परिस्थिती निर्माण झाल्याने पाण्याची खूप मोठे संकट तालुक्यावर ओढवले आहे. त्यामुळे या भागातील पशुधन जगविण्यासाठी मंगळवेढा तालुक्यामध्ये चाराछावणी व चाराडेपो सुरू करण्याची मागणी आमदार समाधान आवताडे यांनी केली आहे. महाराष्ट्र राज्य विधिमंडळ पावसाळी अधिवेशनामध्ये आमदार आवताडे यांनी लक्षवेधी मांडत मतदारसंघाकडे विधीमंडळाचे लक्ष वेधले.

विधानसभा सभागृहामध्ये ही मागणी करत असताना आमदार आवताडे यांनी सांगितले की, पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील अनेक शेतकऱ्यांचे पशुपालन हे उदरनिवार्हाचे जोडसाधन आहे. परंतु सध्या पावसाने ओढ दिल्याने पाण्याची व चाऱ्याची खूप मोठ्या प्रमाणात टंचाई निर्माण झाली आहे. या भागातील पाण्याची भूजल पातळी ८००ते १००० मीटर एवढ्या खोलीवर असल्यामुळे पिण्याच्या व जनावरांच्या पाण्याची समस्या अतिशय गंभीर झाली आहे. त्याचबरोबर पाण्याची उपलब्धता नसल्यामुळे अनेक पशुपालक ४००० ते ५००० हजार रुपये प्रतीटन दराने ऊसाचा चारा आणत आहेत. सध्या मतदारसंघाच्या मंगळवेढा तालुक्यातील विविध गावांमध्ये गावभेट दौरा सुरु असताना अनेक शेतकरी व पशुपालक यांनी या टंचाई पार्श्वभूमीवर चारा डेपो सुरु करण्याची माज्याकडे मागणी केली होती. मंगळवेढा तालुक्यातील पशुधन पालकांची मोठी संख्या पाहता तब्बल पाच लाख लिटर दुधाचे प्रतीदिन संकलन होत आहे. जनतेच्या या अर्थकारणाचा महत्वपूर्ण असणारा दुध व्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी व पशुधन जगविण्यासाठी शासन पातळीवरून सदर चारा डेपो लवकरात-लवकर सुरु करण्याची कार्यवाही व्हावी अशी मागणी आ. आवताडे यांनी केली आहे. या चाराछावणी व चाराडेपो सुरु करण्यासाठी आमदार आवताडे यांनी मागील काही दिवसांमध्ये राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व इतर संबंधित मंत्री महोदय यांच्याकडे प्रत्यक्ष भेटून पत्र व्यवहाराच्या माध्यमातून पाठपुरावा केला आहे. त्याचबरोबर मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिण भागातील चाळीस गावांसाठी वरदायिनी असणारी ४०गाव भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सुरू होऊन या योजनेअंतर्गत येणारे पाणी वीस गावांपर्यंत पोहोचले आहे. परंतु उरलेल्या वीस गावांना व इतर वाड्या-वस्त्यांवर माणसांना व जनावरांना पिण्यासाठी या योजनेचे पाणी देण्यासाठी शासन पातळीवर प्रयत्न होणे गरजेचे असल्याचे आमदार आवताडे यांनी सांगितले. दुष्काळी तालुका असा नैसर्गिक नीतिमत्तेचा कलंक गेली अनेक वर्ष आपल्या माथ्यावर असणाऱ्या मंगळवेढा तालुक्यातील जनतेच्या दुष्काळाची दाहकता कमी करण्यासाठी व उरलेल्या गावांमध्ये ही पाणी लवकरात-लवकर सुरू करण्याची मागणी आमदार आवताडे यांनी यावेळी केली. सन २०१८-१९ मध्ये दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मंगळवेढा व सांगोला तालुक्यामध्ये सुरू करण्यात आलेल्या जनावरांच्या मंगळवेढा तालुक्यामध्ये ६० चाराछावण्या चालकांचे जवळपास १२ कोटी व सांगोला तालुक्यातील १६० छावण्या चालकांचे २२ कोटी बिले शासनदरबारी प्रलंबित आहेत. परंतु तत्कालीन चारा छावण्या चालकांचे बिल अद्यापही अदा करण्यात न आल्यामुळे या चालकांना खूप मोठ्या अर्थिक विवांचनेला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे आशा चालकांची बिले ही लवकरात लवकर मिळावेत अशी मागणी आमदार आवताडे यांनी केली आहे. राज्यातील शेतकरी व सर्व सामान्य जनतेचे प्रती अतिशय संवेदनशील आणि भक्कम असणारे हे सरकार या सर्व मागण्या लवकरात लवकर मार्गी लागण्याच्या अनुषंगाने पावले उचलतील असा विश्वास आमदार आवताडे यांनी व्यक्त केला.

# इर्शाळवाडी येथील दरड ग्रस्तांना विठ्ठल प्रतिष्ठानच्या वतीने अत्यावश्यक वस्तूंचे किट वाटप



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** रायगडमधील इर्शाळवाडी येथे दरड कोसळल्याने अख्खं गाव जमीनदोस्त झाले. याठिकाणी ढिगाऱ्याखाली बरेच मृत पावले आहेत.बुधवारी मध्यरात्रीपासून इर्शाळवाडीत शोध मोहिम सुरू आहे. आतापर्यंत या दुर्घटनेत अनेक जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. दुर्घटनेत जे बचावले आहेत त्यांच्यासाठी एक महिना पुरेल एवढा किराणा मालाचे किट पंढरपुर येथील *विठ्ठल प्रतिष्ठान* च्या माध्यमातून बेस कॅम्प येथे प्रशासनाकडे देण्यात आला आहे.

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असणाऱ्या *विठ्ठल प्रतिष्ठान* ने सामाजिक बांधिलकी जपत जीवनावश्यक वस्तूंचे किट 100 किट खालापूर तालुक्यातील चौक येथे असणाऱ्या बेस कॅम्प येथे देण्यात आले आहे.

यामध्ये गहू, तांदूळ, साखर, खाद्यतेल, तूर दाळ, साबण, चहा, टूथपेस्ट, बिस्कीट अश्या वस्तू देण्यात आल्या. खलापूरचे तहसीलदार तांबोळी यांच्याशी संपर्क साधला सर्व वस्तू प्रशासनाकडे सुपूर्द केल्या आहेत. पंढरपुरचे तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी आणि सध्याचे खलापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांचीही मदत झाली. मुख्यमंत्र्यांनी आव्हान केल्यानंतर अनेक संस्था मदतीसाठी पुढे आले आहेत.

VEERBHADRESHWAR EDUCATIONAL TRUST'S (R)
VEERBHADRESHWAR COLLEGE OF PHARMACY
RECOGNISED BY: GOVT OF KARNATAKA
APPROVED BY PHARMACY COUNCIL OF INDIA
HURRY UP
ADMISSIONS ARE OPEN FOR D.PHARMACY
ELIGIBILITY - PASS 10+2 SCIENCE EXAMS OR PUC WITH PCM OR PCB OR PCMB
LIMITED SEATS
QUALIFIED & EXPERIENCED LECTURERS
LIABRARY FACILITIES
WELL FURNISHED LAB
SMART CLASSROOMS
HOSTEL FOR BOYS & GIRLS
CONTACT
GUDDAMBE ELECTRONIC WARE HOUSE BUILDING, 2ND FLOOR, OPP. SGN PU.COLLEGE, GUBBI COLONY, BEHIND KEB OFFICE, M.G.ROAD, KALABURAGI - 585 105.
SPOT ADMISSION AT SOLAPUR ON EVERY SUNDAY
FOR MORE DETAILS
M. 9916334758
(CHAIRMAN)
08472 - 234758

BAMS , MBBS , BHMS
NEET मध्ये कमी मार्क्स आहेत?
डॉक्टर व्हायचंय? ॲडमिशन घ्यायचे आहे?
घाबरू नका.. आम्ही करून देतो कमी बजेटमध्ये
BAMS , MBBS , BHMS..In कर्नाटक
(PCB 50%, NEET eligible )
आजच संपर्क करा व तुमचे ॲडमिशन कन्फर्म करा
मो. 98 23 58 99 05